## निशाणी क्र. ४५ वरील आदेश

१. सदरचा अर्ज प्रतिवादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे त्याच्या लेखी कैफीयतीमध्ये दुरुस्तीच्या परवानगीसाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार दाव्यामध्ये अजुन इतर मिळकती वादीने सामील केलेल्या नाहीत. त्याही मिळकती एकत्र कुटुंबाच्या आहेत आणि त्या मिळकतीचा तपशिल कथनामध्ये येणे आवश्यक आहे. तसेच काही पक्षकार हे आवश्यक पक्षकार केलेल नाहीत. तशी कथने लेखी कैफियतीमध्ये घेतलेला आहेत. परंतु, त्याचा तपशिल लेखी कैफियतीमध्ये कथन केलेला नाही. सदरची माहिती प्रतिवादींना नंतरहुन मिळाली. म्हणुन पुढे तांत्रिक दोष राहु नेयत म्हणुन प्रतिवादी सदरची दुरुस्ती करु इच्छीत आहे.

३. त्यावर वादीने नि. क्र. ४९ वर म्हणणे दाखल केले. वादीच्या म्हणण्यानुसार अर्ज कायदेशीर नाही व कामकाज लांबणीवर टाकण्याच्या उद्देशाने अर्ज केलेला आहे. प्रतिवादी म्हणत असलेली मिळकत ही वडीलोपार्जित नाही त्या कष्टार्जित आहेत. प्रतिवादीचा प्रतिदावा नाही म्हणुन अर्ज शेवटी नामंजुर करावा अशी विनंती केलेली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

५. वादीच्या विधीज्ञांनी त्यांचे युक्तीवादाव्या पृष्टयर्थ खालील न्यायनिर्णयांचा आधार घेतला आहे.

*1. Nandyala Sridevi Vs. Gottimukkala Satyanarayan Raju, Civil Revision Petition No. 6995/2017 dtd. 30th November, 2018.*

*2. High Court of Punjab and Haryana, Hari Singh Vs. Amarjit Singh & Anr. Cr. No. 4953/2009, dtd. 1 September, 2009.*

*3. AIR 2007 SUPREME COURT 806, Adendraprasadji N. Pande & Anr. Vs. Swami Keshavprakeshjasji N. & Ors., dtd. 8 December, 2006.*

*4. High Court of Bombay Bench At Aurangabad, Girdhar Parashram Patil and Others Vs. Bhikiben Shankarlal Wani Died Through, dtd. 24 June 2024.*

६. या अर्जाचे निर्णयासाठी मी खालील मुद्दे निर्धारीत करीत आहे. मी प्रत्येक मुदयावर माझा निष्कर्ष त्या खाली दिलेल्या कारणास्तव नोंदवित आहे.

| अ.क्र | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रस्थावित दुरुस्ती दाव्यातील सर्व विवादीत प्रश्न सुटण्यासाठी आवश्यक आहे काय? | होकारार्थी |
| २. | आदेश काय | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमीमांसा

७. सदरचा दावा हा हिंदु एकत्र कुटुंबाच्या मिळकतीच्या वाटपासाठी व इतर अनुषांगिक अनुतोषासाठी दाखल केलेला आहे. यापुर्वी प्रतिवादीने लेखी कैफियतीमध्ये एकत्र कुटुंबाच्या पुर्ण मिळकती दाव्यात सामील केलेल्या नाहीत अशी कथने घेतलेली आहेत. तसेच इतर पक्षकारांना दाव्यात सामील करणे आवश्यक आहे पंरतु केलेले नाही असेही कथने घेतलेली आहेत. आता प्रतिवादी त्या कथनांच्याबाबतीत तपशिल आणि स्पष्टीकरण त्यांच्या लेखीकैफियतीमध्ये समाविष्ट करु इच्छीत आहे.

८. यावर वादीच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, सदरच्या मालमत्ता या स्वतंत्र मालमत्ता आहेत परंतु एकत्र कुटुंबाच्या नाहीत. त्यावर मी नमुद करतो की, हा पुराव्याचा भाग आहे.

९. जेवढे कठीण नियम दावा दुरुस्तीला लागु आहेत तेवढे लेखी कैफियतीला लागु नसतात असे कायद्याचे तत्व आहे. प्रतिवादी हा वेगवेगळा बचाव घेउ शकतो. पुढे असेही आहे की, प्रतिवादी विकल्पे करुनही बचाव घेवु शकतो. प्रतिवादी हा पुर्वीच केलेल्या कथनांशी सुसंगत स्पष्टीकरण करणारी कथने अभिलेखावर आणु इच्छीत आहे. त्याची सत्यता पाहण्याची आता गरज नाही. तो पुराव्याचा भाग आहे.

१०. सदरचा अर्ज हा गैरहेतुन केलेला आहे असे दिसुन येत नाही. दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तावित दुरुस्ती ही दाव्यातील सर्व प्रश्नांच्या निर्धारण करण्यासाठी आवश्यक वाटते. दावा हा आता वादीच्या पुराव्यासाठी आहे. निश्चीतच हा अर्ज उशिराने दाखल केलेला आहे. पंरतु या अर्जामुळे वादीच्या मुळ कथनाला कोणतीही बाधा येणार नाही. त्यामुळे फक्त अर्ज उशिराने दिला म्हणुन तेवढया एकमेव कारणासाठी नामंजुर करता येणार नाही. याउपर जी काही वादीची

गैरसोय झाली ती खर्चाच्या स्वरुपात भरुन काढता येईल. वादीने दाखल केलेले पुर्वन्यायनिर्णय मधील परिस्थिती व या केसमधील परिस्थिती वेगवेगळया आहेत. त्यामुळे वादीने दाखल केलेले न्यायनिर्णय या प्रकरणाला लागु होणार नाहीत. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो.

**आदेश**

१. प्रतिवादींचा लेखी कैफियत दुरुस्तीचा अर्ज निशाणी क्र. ४५ हा रुपये २०००/–च्या खर्चाच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. खर्चाची रक्कम दिल्यावर मुदतीत प्रतिवादीने दुरुस्ती करावी.

PATHAN JAHANGIR RASHEED

Digitally signed by PATHAN JAHANGIR RASHEED
Date: 2025.08.12 14:58:54 +0530

दिनांक- ०४.०८.२०२५ (जे. आर. पठाण)

ठिकाण- येवला. २रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, येवला,

जि. नाशिक.